पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड आयुक्तालय
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे, महाराष्ट्र ४११ ०३३
फोन नं ०२० २७३५०१२०

# प्रेसनोट दिनांक १५/०१/२०२३

## दरोडा विरोधी पथकाकडुन रेकॉर्डवरील गुन्हेगारास अटक, ०३ गावठी पिस्टल व ०८ जिवंत काडतुसे जप्त

मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना पिंपरी चिंचवड शहरामध्ये अवैध्यरित्या शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगाराचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करणेबावतचे आदेश दिले होते. त्याअनुशंगाने आमचे व श्री पदमाकर घनवट, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पि चिं चे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकचे व.पो.नि. श्री रामदास इंगवले, अधिकारी व अंमलदार हे अवैध शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती घेत होते.

दरोडा विरोधी पथकाकडील अधिकारी व अंमलदार हे अवैध अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगांराची माहिती घेत असताना **पोलीस शिपाई ब.नं. २६४३ गणेश सावंत व पोलीस शिपाई ब.नं. २६७३ सुमित देवकर** यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या माहितीच्या अनुशंगाने दि.१४/०१/२०२३ रोजी पथकाकडील स.पो.नि. अंबरिष देशमुख तसेच पो.ना १०६२ गणेश हिंगे, पो.शि. २६७३ सुमित देवकर, पो.शि. २९४७ विनोद वीर व पो.शि. २६४३ गणेश सावंत यांनी रेकॉर्डवरील आरोपी नामे **संदीप अनंता भुंडे, वय - २९ वर्षे, रा डी- प्रेस्टीज, फ्लॅट नं ३, बावधान बु, शिवसेना चौक, पुणे यास शिवसेना चौक, बावधान बु, पुणे** येथुन १७/३० वा ताब्यात घेवुन त्याचेकडुन ०२ गावठी पिस्टल व ०६ जिवंत काडतुसे जप्त करुन त्याचेविरुध्द हिंजवडी पोलीस स्टेशन पिं चि येथे गु.र.नं. - ३१/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

मा.वरिष्ठांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास दरोडा विरोधी पथकाकडे आल्यावर तपासादरम्यान सदर आरोपीकडुन आणखीन ०१ गावठी कट्टा व ०२ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहे. सदरबावत पुढील तपास हा श्री अंबरिष देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा हे करीत आहे.

**आरोपीचा पुर्वइतिहास :-** नमुद आरोपी याचेविरुध्द यापुर्वी सुध्दा सन २०२० मध्ये अवैध्य रित्या अग्नीशस्त्र बाळगल्याबद्दल भोसरी पोलीस स्टेशन, पिं चि येथे गु.र.नं. ६३०/२०२०, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),५(२५),३५(१) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे. अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त, विनय कुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त, मनोज लोहीया, मा. अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, पद्माकर घनवट, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रामदास इंगवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, अंबरिष देशमुख, तसेच पोलीस अंमलदार गणेश हिंगे, विनोद वीर, गणेश सावंत, सुमित देवकर व टीएडब्ल्यु पथकाचे पोलीस अंमलदार नागेश माळी व राजेंद्र शेटे यांचे पथकाने केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड